महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा. क्र. औसंवि/ब/ 32312 दिनांक : 27 AUG 2015

# परिपत्रक

**विषय :** MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy करिता महावितरण कंपनी अंतर्गत परिमंडल स्तरावर नोडल ऑफिसरची नियुक्ती करणेबाबत.

**संदर्भ :** सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. ७३१, दि. ०८.०१.२०१५

*********

दि. ०१.०१.२०१५ ते दि. ३१.१२.२०१५ या कालावधीकरिता कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांकरिता MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy (मेडीक्लेम योजना) दि ओरिएंटल इन्शूरन्स कंपनी, पुणे यांच्यामार्फत सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजनेअंतर्गत कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांना वैद्यकीय सुविधांचा लाभ देय आहे.

सदर योजनेअंतर्गत वैद्यकीय सुविधांचा लाभ विमा कंपनीकडून तातडीने मिळावा व वैद्यकीय लाभांच्या प्रतिपूर्तीसाठी विमा कंपनीकडे योग्य ती कागदपत्रे सादर करण्यासाठी मदत व्हावी, तसेच विमा कंपनी, M. D. India (TPA) व कर्मचारी यांच्यामध्ये समन्वय असावा याकरिता परिमंडल स्तरावर नोडल ऑफिसर नियुक्त करणे आवश्यक आहे. सबब, परिमंडल कार्यालयांतील उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी / उपकामगार अधिकारी (क्रिडा) व सांघिक कार्यालयाकरिता वरीष्ठ व्यवस्थापक (मासं) / व्यवस्थापक (मासं), औद्योगिक संबंध विभाग हे MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy करिता नोडल ऑफिसर म्हणून नियुक्त करण्यात येत आहेत.

MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy अंतर्गत जे कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असणारे कुटुंबातील ०५ सदस्य हे कॅशलेस योजनेचा लाभ घेतील अथवा जे कर्मचारी वैद्यकीय प्रतिपूर्ती घेणार असतील त्यांनी रुग्णालयात दाखल झाल्यानंतर ४८ तासांच्या आत प्राथमिक दावा सुचनांच्या अनुषंगाने पॉलिसीधारक रुग्णाचे नाव, रुग्णालयाचे नावं व पत्ता इ. माहितीसह msebmediclaim@mdindia.com यावर ईमेल पाठवावा. तद्नंतर, वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या लाभासाठीचा प्रस्ताव संबंधीत परिमंडलाच्या उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी / उपकामगार अधिकारी (क्रीडा) व सांघिक कार्यालयाच्या बाबतीत व्यवस्थापक (मासं), औद्योगिक संबंध विभाग (ब), प्रकाशगड, मुंबई यांचेमार्फत खालील पत्त्यावर पाठवावा.

**M. D. India Health Care Services (TPA) Pvt. Ltd.**
**MSEB HCL GMC Claims Department -163600/48/15/04613,**
**Survey No. 46/1, E-Space A-2 Building, 3rd Floor,**
**Pune Nagar Road, Vadgoansheri,**
**Pune- 411014.**
**(Toll free No. 1860 233 4477)**

**MSEB HCL GMC Claims Process** अंतर्गत सादर करावयाची कागदपत्रे व इतर माहिती तसेच MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy करिता परिमंडल व सांघिक कार्यालय स्तरावर नोडल ऑफिसर म्हणून नियुक्त केलेल्या नोडल ऑफिसर यांचे Email-id याबाबतची माहिती सोबत जोडली आहे. उपरोक्त योजनेसंदर्भात **www.mdindiaonline.com** यावर अथवा **Toll Free No. १८६० २३३ ४४७७** यावर संपर्क करुन अधिक माहिती व चौकशी मिळू शकते.

सदर परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावरील "MSEBHCL Mediclaim" या शिर्षकाखाली उपलब्ध असून त्याची मुद्रांकित प्रत (Hard Copy) प्रसारीत करण्यात येणार नाही. कर्मचाऱ्यांच्या सोईकरिता सदर परिपत्रक महावितरणच्या Intranet – RAPDRP या संकेत स्थळावरील Industrial Relations Department यावर देखील उपलब्ध आहे.

(नीलेश गटणे)
कार्यकारी संचालक (मासं)
महावितरण

प्रति
सर्व कार्यकारी अभियंता व तत्सम दर्जाचे अधिकारी यांचेपर्यंत.

प्रत माहितीसाठी सविनय सादर :
१) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वितरण कंपनी मर्या., मुंबई.
२) संचालक (वित्त) / (संचलन) / (प्रकल्प) म.रा.वि.वितरण कंपनी मर्या., मुंबई.